
वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि. १२ मे २०२५ पाने ४ किंमत ३

# बोगस शिक्षकांबरोबरच संस्थाचालकांच्या मनमानीला आता बसणार चाप

## शिक्षण विभागाचा मोठा निर्णय, अनुदानित शाळेतील लाखो शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदांचे प्रथमच मॅपींग होणार

### संच मान्यतेनुसार मंजूर पदे आणि वेतन संबंधिची माहिती जूनपर्यंत एकत्र केली जाणार




Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

### माहिती न भरणाऱ्या शिक्षकांचे वेतन थांबणार, शालार्थ प्रणालिचे अद्यावतीकरण करून संच मान्यतेतील उच्चतम मान्य शिक्षक व शिक्षकेत्तर पदांसाठी वेतन काढले जाणार

मुंबई, (दिव्य न्युज):- शिक्षण विभागाने राज्यात मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे नियमबाह्य आणि बोगस शिक्षकांबरोबरच, संस्था चालकांच्या मनमानीला देखील चाप बसणार आहे. शिक्षण विभागाने संचमान्यतेनुसार शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांची मॅपिंग प्रक्रिया सुरू केली आहे. तसा आदेशच काढला आहे. या आदेशामुळे राज्यातील शिक्षण विभागात चांगलीच खळबळ उडाली आहे.

शिक्षण विभागाने घेतलेल्या या निर्णयानुसार राज्यातील सरकारी, अनुदानित शाळांतील लाखो शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांचे प्रथमच मॅपिंग होणार आहे. वेतन आणि मंजूर पदे याबाबत शिस्त लावण्यासाठी शिक्षण विभागाने हे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. ▶▶ पान २ वर

## या प्रणालित नसलेल्या शिक्षकांचे वेतन रोखले जाणार असल्याने शिक्षकात खळबळ

# दहावीचा निकाल उद्या लागणार

मुंबई, (दिव्य न्युज):- दहावीच्या निकालाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. या निकालाची पालक आणि विद्यार्थी आतुरतेने वाट पाहताना दिसत आहेत. जवळपास सर्वच बोर्डांचे निकाल जाहीर करण्यात आले. मात्र ही प्रतीक्षा अखेर संपली आहे. महाराष्ट्र बोर्डाच्या दहावी परीक्षेचा निकाल उद्या, अधिकृत संकेत स्थळावर दुपारी १ वाजता पाहता येणार आहे. याच



पार्श्वभूमीवर दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निकालापूर्वीच आनंदाची बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र बोर्डानं एक महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे, यामुळे आता दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीची प्रवेश प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन पद्धतीनेच राबविणे बंधनकारक करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, ▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणींना ५० हजार मिळणार?

## राज्य सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत

मुंबई, (दिव्य न्युज):- राज्य सरकारची बहुचर्चित लाडकी बहीण योजनेचा एप्रिल महिन्याचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याचा निधी वळवण्यात आला, असा आरोप सामाजिक आणि आदिवासी विकास खात्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी केला आहे.अशातच आता लाडकी बहीण योजनेमध्ये सरकार दरमहा दीड हजार रुपये देते. ज्या बहिणींना उद्योग सुरु करावयाचा असेल आणि भांडवल नसेल तर या योजनेच्या हमीवर लघू उद्योगांसाठी कर्ज उपलब्ध करुन देणयाचा शासनाचा प्रयत्न आहे, असं प्रतिपादन राज्याचे अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्यातील लाडक्या बहिणींना दरमहा दीड हजार रुपये शासनाच्यावतीने दिले जातात. या पोटी ४५ हजार कोटी रुपये खर्च होतात. एखाद्या महिन्यात थोडासा ▶▶ पान २ वर



## महायुती विरुद्ध महाविकास आघाडी होणार 'बिगफाईट'

# जिल्हा परिषदेतही उडणार धुरळा



मुंबई, (दिव्य न्युज):- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या रखडलेल्या निवडणुकांबाबत मंगळवारी (ता.६) सुप्रीम कोर्टाने महत्त्वपूर्ण आदेश देत आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा निकालात काढत येत्या चार महिन्यात निवडणुका घेण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर कोल्हापुरातील राजकीय हालचाली गतिमान होण्याला सुरुवात झाली आहे. कोल्हापूर महानगरपालिकेबरोबर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीकडे देखील जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे. मिनी विधानसभा समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेत सदस्य होण्यासाठी अनेक इच्छुकांची धडपड दिसून येत आहे.

या निवडणुकीवर देखील विधानसभा निवडणुकीचा परिणाम होणार असून, महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पाहायला मिळणार आहे. कोल्हापूर जिल्हा परिषदेची निवडणूक जुन्याच ६७ ▶▶ पान २ वर



# राज्यावरील अवकाळीचे सावट जाईना, हवामान विभागाकडून यलो अलर्ट जारी

मुंबई, (दिव्य न्युज):- गेल्या काही दिवसांपासून राज्यातील अनेक भागांमध्ये अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये वादळी वारा, गारांचा पाऊस आणि अवकाळी पाऊस यांच्या येण्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. मे महिन्यात अनेक पिके काढणीला आलेली असताना अवकाळीने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पण आता हवामान खात्याने पुन्हा विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्र या भागात वादळी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे राज्यातील अवकाळीचा मुक्काम वाढल्याचे बोलले जात आहे. तर हवामान विभागाकडून राज्यातील काही जिल्ह्यांना यलो अलर्ट देखील जारी केला आहे.

हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, दक्षिण कोकण,गोवा आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी ३०-४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच मध्य महाराष्ट्रातील काही ▶▶ पान २ वर

## टोळीत वाल्मिक कराड समर्थक: बीड जिल्ह्यात ५ महिन्यांत चौथी कारवाई

# परळीच्या फड गँगवर 'मकोका'

परळी, (दिव्य न्युज):- तरूणावर प्राणघातक हल्ला करुन जिवे मारण्याचाप्रयत्न करत त्याच्याकडील २ लाख ७० हजारांचीरक्कम लंपास केल्याच्या गुन्ह्यात, परळीतील रघुनाथफड गँगवर संघटीत गुन्हेगारी कायदा (मकोका)नुसार कारवाई करण्यात आली. या गँगच्या ७ जणांवरमकोका लागला असून यातील ५ जणांना पोलिसांनी अटक केली होती. त्यातील चौघांना यापुर्वी जामीन मिळाला असून १ कारागृहात, तर चौघे फरार आहेत. दरम्यान जिल्ह्यात ५ महिन्यांतील ही मकोकाची चौथी कारवाई आहे. फड गँग



वाल्मिक समर्थक आहे.

परळी शहर पोलिस ठाण्यात न्यायालयाच्याआदेशावरुन १ मार्च २०२५ रोजी गुन्हा नोंद झाला होता.सहदेव सातभाई यांनी तक्रार दिली होती. त्यांच्यातक्रारीनुसार, १८ ऑक्टोबर २०२३ ▶▶ पान २ वर

### चौघांना जामीन, धनराज फड,गोट्या गिते दोघेही फरार

या प्रकरणात रघुनाथ फड, जगन्नाथफड, सुदीप सोनवणे, बालाजी दहिफळे,विलास गिते या पाच जणांना अटक झालीहोती. सुदीप सोनवणे वगळता इतरांनाजामीन मिळाला आहे. तर धनराज उर्फराजेभाऊ फड व ग्यानदेव उर्फ गोट्या गितेहे दोघे फरार आहेत. परळी पोलिसदोघांचा शोध घेत आहेत.

### परळी, अंबाजोगाई तालुक्यांत होती दहशत

रघुनाथ फड हा या टोळीचा म्होरक्या आहे. या टोळीने परळीव अंबाजोगाई तालुक्यात दहशत निर्माण केली होती. मागील१० वर्षांत या टोळीवर १० गुन्हे नोंद असून ९ गुन्हे न्यायप्रविष्ठआहेत तर १ गुन्हा तपासावर आहे. हे सर्व गुन्हे ३ वर्षांपेक्षाजास्त शिक्षा असलेले आहेत. यामध्ये खुनाचा प्रयत्न,दुखापत, दंगा, अवैध शस्त्र बाळगणे, सरकारी कामातअडथळा, दरोडा, जबरी चोरी, मारहाण, गंभीर दुखापत,रस्ता अडवणे असे गुन्हे आहेत.

बा अदब,बामुलाहिजा,होशियार! शहंशाहाँओं के शहंशाह,
वो ही अपने मशहूर टाइम आज रात आठ बजे पधार रहे हैं

**सावधान,सावधान,सावधान**





# ‘तुमचे रणगाडे, प्लेन, मिसाईल हे खपवण्याकरता तुम्ही हे करता काय?

## खा.उदयनराजे भोसलेंची जहरी टिका

सातारा, (दिव्य न्युज):- आजची परिस्थिती बघून बघून मला मानसिक त्रास होतोय..राष्ट्रांमध्ये कोणी या बाजूला राहतं. कोणी त्या बाजूला राहतं. फाळणी का झाली माहित नाही? त्या वेळेच्या नातेवाईकांना विचारावे लागेल, कोणी फाळणी केली हे मला माहित नाही, त्याचं संशोधन तुम्ही करा. कुणाला काही प्राईम मिनिस्टर व्हायचं. त्यावेळेस किती जीव गेले, लोक मरताना बघताना वाईट वाटतं, कित्येक जण म्हणतात ही कुठली पद्धत आहे. कुणीतरी कुणाच्या तरी आईचा मुलगा आहे, त्यांना कसं वाटत असेल मला सांगा..? असे भाजपाचे खासदार उदयनराजे भोसले यांनी सोलापूरात एका कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

उदयनराजे भोसले पुढे म्हणाले की, हा वाद मिटवण्यासाठी जागतिक पातळीवर चर्चा घडवून आणल्या तर त्या चर्चेला मी जाईन. बोललो तर सगळ्यांना वाटतं, मी बोलतो म्हणूनतुमचे रणगाडे, प्लेन, मिसाईल हे खपवण्याकरता तुम्ही हे करता का काय.? आज किती लोकांचा जीव जातोय आपण पाहतोय. एक एक वेळेस डोकं काम करायचं बंद होतं. त्या ठिकाणी बॉर्डरवर आपल्या कुटुंबातील कोण गेलं तर कसं वाटेल? जगात कोणी असू द्या, थोडं शांत बसून, आत्मचिंतन करून विचार केला पाहिजे इथं आपण काय करतोय.? याचे उत्तर कोणीतरी दिलं पाहिजे असेही ते म्हणाले.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीबद्दल विचारले असता ते म्हणाले की हे डोंगर जेवढे दिसत आहेत ना ते तुम्ही आम्ही निर्माण केलेले नाहीत, पहिल्यापासून आहेत. हा निसर्ग आहे आणि निसर्गापेक्षा कोणी मोठे नाही. आज मला सांगा त्यावरून वाद सुरु आहे, कमाल आहे. दहशतवादी कसे निर्माण झाले..? का निर्माण झाले..? तुम्ही पत्रकार आहात तुम्ही विचार करा, का निर्माण झाले.? ज्याला दोन टाईम जेवण मिळत नसेल तो काय करणार ? त्यांची मुलं जर उपाशी राहत असतील तर काय करणार.?हिंदू - मुस्लिम,हे आणि ते,सर्वांना उदंड आयुष्य लाभो. हॉस्पिटलमध्ये गेलात, कोणावर वेळ येऊ नयेपण त्यावेळेस तुम्ही काय विचार करत नाही ना ते रक्त कोणाचे आहे. तुझा ब्लड ग्रुप काय ए पॉझिटिव्ह, ए निगेटिव्ह, त्यामुळे जे चाललंय ते कोणालाही मान्य नाही. काही लोकांना मान्य असेल? मी त्या कुटुंबातील घटक आहे म्हणून हे बोलत नाही. परंतु मला तर हे अजिबात चालत नाही.. ते बघून बघून मला मानसिक त्रास होतो. छत्रपती शिवाजी महाराजांना हे अभिप्रेत होतं का.?

# युद्ध म्हणजे रोमँटिक गोष्ट नाही, माजी लष्करप्रमुख जनरल नरवणे काय म्हणाले?

पुणे , (दिव्य न्युज):- भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये सुरू असलेल्या तणावानंतर शस्त्रसंधीची घोषणा करण्यात आली. पण अवघ्या काही तासांमध्येच पाकिस्तानने या शस्त्रसंधीचे उल्लंघन करत पुन्हा एकदा घात केला. पण, पाकिस्तानने केलेल्या प्रत्येक हल्ल्याचा भारतीय सैन्याने प्रतिकार केला. पण, भारताने पाकिस्तानसोबत केलेल्या शस्त्रसंधीनंतर ती करण्याची गरज नव्हती, अशी मते देशभरातून आली. काहींनी भारताच्या या निर्णयाला सहमती दर्शवली तर काहींनी विरोध करत पाकिस्तानसोबत युद्ध करण्याचा सल्ला दिला. या सर्व प्रश्नांवर देशाचे माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांनी आपले परखड मत मांडले आहे.

पुण्यामध्ये झालेल्या एका कार्यक्रमात मनोज नरवणे म्हणाले की, काही लोक विचारत आहेत की, आपण पूर्ण युद्ध का केले नाही? आदेश मिळाला तर मीदेखील युद्धात जाईन, पण युद्ध माझी पहिली पसंती नसेल. माझी पहिली पसंती मुत्सद्देगिरीला आहे. युद्ध ही काही रोमँटिक गोष्ट नाही. ना ती एखाद्या बॉलीवूडच्या सिनेमासारखी आहे. युद्धामुळे मृत्यू, निर्वासित समस्या, कुटुंबांचे विस्थापन असे अदृश्य, पण खोल सामाजिक नुकसान होते. युद्ध आणि हिंसा याकडे शेवटचा उपाय म्हणूनच पाहायला हवे. असे म्हणत आपले परखड मत व्यक्त केले आहे.




पुण्यातील आयसीएमएच्या कार्यक्रमात माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे म्हणाले की, ज्यांनी आपल्या जवळच्या व्यक्तींना गमावले, त्यांच्यासाठी ते कायमचे दुःख ठरते. ज्यांनी भयानक दृश्ये पाहिली, आहेत त्यांना २० वर्षांनंतरही घाम फुटतो आणि मानसोपचारतज्ज्ञाची आवश्यकता भासते. युद्ध हे रोमँटिक बॉलिवूड सिनेमासारखे नाही. तो एक गंभीर मुद्दा आहे. युद्ध किंवा हिंसाचार हा शेवटचा उपाय ठेवला पाहिजे. आपले पंतप्रधान म्हणाले होते की, हे युद्धाचे युग नाही. मूर्ख लोक आपल्यावर युद्ध लादण्याचा प्रयत्न करतील, पण आपण त्याचे स्वागत करू नये. असे म्हणत त्यांनी महत्त्वाचा संदेश दिला. संवादाद्वारे मतभेद सोडवणे आणि सशस्त्र संघर्षाच्या टप्प्यावर न पोहोचणे, ही आपली प्राथमिकता असायला हवी. राष्ट्रीय सुरक्षेत आपण सर्व समान भागीदार आहोत. आपण केवळ देशांमधीलच नव्हे तर आपल्यातील मतभेदही सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे, मग ते कुटुंबांमध्ये असोत किंवा राज्ये, प्रदेश आणि समुदायांमध्ये असोत. हिंसाचार हा उपाय नाही, असे ते याव्लेई म्हणाले.

# आमच्यावर कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव नाही, कायद्यानुसार कारवाई होणार - उपायुक्त संदीप सिंह गिल

पुणे , (दिव्य न्युज):-पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षांच्या अडचणी वाढल्या आहेत. शंतनू कुकडे प्रकरणात दीपक मानकरांनी बनावट कागदपत्र सादर करून पोलिसांची दिशाभूल केल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलाय. अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेमध्ये सहभागी आहे. अजित पवार हे उपमुख्यमंत्री आहेत आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री सुद्धा आहेत. अशातच पुणे शहराच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर गुन्हा दाखल झाल्यानं पुणे शहराच्या राजकारणात मोठी चर्चा होऊ लागली आहे. यावरून आमच्यावर कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव नाही, कायद्यानुसार कारवाई होणार असल्याचे पोलीस उपायुक्त संदीप सिंह गिल यांनी सांगितले आहे.

गिल म्हणाले, समर्थ पोलीस ठाण्यात शंतनू कुकडे विरोधातील एका गुन्ह्याचा तपास सुरू होता. तपासा दरम्यान त्याच्या रेड हाऊस संस्थेच्या व कुकडेच्या अकाउंटवर आर्थिक देवाण घेवाण झाली होती. त्याच तपासातून दीपक मानकर यांना काही कागदपत्र सादर करायला सांगितली होती. मानकरी यांनी त्यात एक बनावट कागदपत्र सादर केलं. रौनक जैन आणि दीपक मानकर यांच्याकडून बनावट कागदपत्र सादर करण्यात आली आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शंतनू कुकडे, दीपक मानकर, रौनक जैन यांच्यासह काही जणांवर गुन्हे दाखल आहेत. हा गुन्हा जामीन पात्र नाही. गुन्ह्यात कोणाचा किती सहभाग याची चौकशी सुरू असून पुढील तपास सुरू आहे. आमच्यावर कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव नाही. त्यामुळे कायद्यानुसार कारवाई सुरू राहणार आहे. सदर गुन्ह्यात दीपक मानकर यांची दोन वेळा चौकशी करण्यात आली आहे. एक कोटी १८ लाख रुपयांची आर्थिक देवाण-घेवाण झाल्याची माहिती समोर आली आहे.



जैन याच्या बँक खात्यातून आमच्या बँक खात्यात पैसे आले. आमचा एका जमिनीचा व्यवहार आहे. तो याच्यासोबत झाला. आणि त्याची कायदेशीर इसार पावती देखील आहे. शंतनू कुकडे याचे वैयक्तिक जीवन आणि त्याचे आर्थिक व्यवहार याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. असं दीपक मानकर यांनी त्यावेळी म्हटलं होतं. दरम्यान आता याच प्रकरणामध्ये दीपक मानकर यांनी पोलिसांना जी कागदपत्र सादर केली आहेत. तीच बनावट असल्याचं पोलिसांच्या तपासात उघड झालंय. त्यामुळे पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली दीपक मानकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलाय.

# बियाणे, खते विक्रीवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथके कारवाईचा अहवाल पालकमंत्र्यांना सादर करणार

बीड, (दिव्य न्युज):- बियाणे, रासायनिक खते आणि कीटकनाशक खरेदीमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी कृषी विभागाकडून जालना जिल्हयात नऊ भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. त्याच प्रमाणे या संदर्भात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक याप्रमाणे आठ तक्रार निवारण केंद्रही सुरू करण्यात येणार आहेत.आगामी खरिप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बियाणे, रासायनिक खते आणि किटकनाशकांची मागणी आणि उपलब्धता यासंदर्भात कृषी विभागाने नियोजन केले आहे. अप्रमाणित बियाणे, खते आणि कीटकनाशक विक्रीत शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी भरारी पथकांच्या मार्फत लक्ष ठेवण्यात येणार आहे.

बियाणे, रखते आणि किटकनाशकांचे २०२४ या वर्षात ९३३ नमुने अप्रमाणित आढळले होते. यापैकी २३ प्रकरणात न्यायालयात खटले दाखल करण्यात आले. ३७ प्रकरणांत संबधितांना ताकीद देण्यात आली असून उर्वरित ७३ प्रकरणांतील कायदेशीर कारवाई प्रक्रियेत असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे कृषी अधिकाऱ्यांनी पालकमंत्र्यांना लेखी स्वरुपात दिली आहे.

पान १ वरून

## बोगस शिक्षकांबरोबरच

संचमान्यतेनुसार मंजूर पदे आणि वेतनासंबंधीची माहिती जूनपर्यंत एकत्र केली जाणार आहे. ही माहिती न भरणाऱ्या शिक्षकांना वेतनाला मुकावे लागणार असल्याचा सज्जड इशाराच दिला आहे.

शिक्षण विभागाने शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांची मॅपिंग प्रक्रियेची जबाबदारी संबंधित शाळा (डलहेश्र) आणि मुख्याध्यापकांवर निश्चित केली आहे. यासाठी नॅशनल इन्फॉर्मेशन सेंटर (एनआयसी)च्या संचमान्यता ‘एपीआय’चा (प्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस) वापर करण्यात येणार आहे. शालार्थ प्रणालीचे अद्ययावतीकरण करून संचमान्यतेतील उच्चतम मान्य शिक्षक व शिक्षकेतर पदांसाठी वेतन काढले जाणार आहे. या प्रणालीत नसलेल्या शिक्षकांचे वेतन रोखले जाणार आहे. या आदेशामुळे शिक्षकांमध्ये खळबळ उडाली आहे.

राज्यातील शाळांना मे महिन्याची सुटी आहे. या कालावधीतच ही माहिती भरली जाणार असून, त्यानंतर जूनचे वेतन या नवीन प्रणालीद्वारे काढले जाणार आहे. यासंदर्भातील सूचना आणि आदेश राज्यातील सर्व शाळा आणि मुख्याध्यापकांना देण्यात आल्या आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सहसंचालक डॉ. श्रीराम पानझाडे यांनी या माहितीला दुजोरा दिला.

संचमान्यता आणि शालार्थ प्रणालीमार्फत शिक्षकांना वेतन अदा केले जाते. अनेकदा ताळमेळ नसल्याने काही खासगी संस्थाचालक बोगस माहिती आणि पदे मंजूर नसलेल्या शिक्षक, शिक्षकेतरांची अधिकची नावे सादर करत होते. ही नावे शाळांकडून ऑफलाइन पद्धतीने कागदावर सादर केली जात होती. त्यात अनेकदा पदे कमी अथवा जास्त होण्याचे प्रकार निदर्शनास आले होते. या प्रकाराला यामुळे चाप बसेल, यामुळे ही मॅपिंग पद्धत वापरली जात आहे.

## दहावीचा निकाल

राज्य सरकारने २५ फेब्रुवारी २०२५ रोजी अधिकृत शासन निर्णय प्रसिद्ध करत अकरावी प्रवेशासाठी स्पष्ट आणि सुसंगत नियमावली जाहीर केली आहे. यामध्ये संपूर्ण प्रक्रिया गुणवत्ताधिष्ठित, पारदर्शक आणि एकसंध असावी, यासाठी आवश्यक सूचनांचा समावेश करण्यात आला आहे.

त्यामुळे या निर्णयानुसार, संपूर्ण राज्यभरातील महाविद्यालये सरकारने निर्धारित केलेल्या अधिकृत ऑनलाइन पोर्टलवरच प्रवेश प्रक्रिया पार पाडणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणांनुसार महाविद्यालय निवडण्याची मुभा देण्यात आली असून, चार फेऱ्यांद्वारे प्रवेश दिला जाणार आहे. या चार फेऱ्यांनंतर ‘सर्वांसाठी खुला प्रवेश’ (ओपन फॉर ऑल) नावाची विशेष फेरी जाहीर करण्यात येणार असून, उर्वरित रिक्त जागांवर त्या माध्यमातून प्रवेश मिळणार आहे. प्रवेश अर्ज सादर करताना विद्यार्थ्यांना त्यांचे वैयक्तिक माहितीपत्रक, गुणपत्रक व प्राधान्यक्रमानुसार निवडलेली महाविद्यालयांची यादी ऑनलाइन प्रणालीत भरावी लागेल.दहावीचा निकाल उद्या दुपारी १ वाजता विद्यार्थ्यांना बोर्डाच्या आणि अन्य संकेतस्थळांवर आपला निकाल पाहता येईल. त्यानंतर आपापल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करण्यात येईल.

## लाडक्या बहिणींना

विलंब झाला तरी विरोधक अफवा पसरवतात. बहिणींनी या अफवांवर विश्वास ठेवू नये. खऱ्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत राहणार आणि योजना बंद होणार नाही, असं अजित पवार म्हणाले.

५० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज देणार

पुढे बोलताना म्हणाले, दरमहा दीड हजार रुपये द्यायचेच आहेत. परंतु त्याबरोबरच जर काही बहिणींना लघु उद्योग सुरु करायची इच्छा असेल परंतु त्यांच्याकडे भांडवल नसेल आणि बँकाचे कर्ज घेण्यासाठी हमीची आवश्यकता असेल तर लाडकी बहीण योजनेच्या दीड हजार रुपये महिना या रकमेची हमी देऊन ५० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाचे प्रयत्न सुरु असल्याचे अजित पवारांनी सांगितले.

कोणत्याही खात्याचा निधी वळवण्यात आला नाही

लाडकी बहीण योजनेतील अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याचा निधी वळवण्यात आला नाही. यावर कोणत्याही मोठ्या योजनेचे बजेट विविध खात्यांमध्ये विभागले जाण्याची सामान्य पद्धत आहे. सामाजिक आणि आदिवासी कल्याण विभागाला या योजनेअंतर्गत विशिष्ट गटांसाठी (अनुसूचित जाती आणि जमाती) निधी वाटप करण्यात आला. परंतु, हा निधी फक्त त्या लाभार्थ्यांवरच खर्च करता येईल, अशी अट आहे.

## जिल्हा परिषदेतही

प्रभागांमध्ये होणार आणि ओबीसींच्या १६ टक्के आरक्षणानुसारच होणार आहेत.दरम्यान, न्यायालयाच्या या आदेशानंतर एन पावसाळ्यात मतदारांना निवडणुकीचे रंग पाहता येणार आहेत. गेल्या अडीच ते तीन वर्षांपासून कोल्हापूर जिल्हा परिषदेवर प्रशासक राज आहे. मात्र या निकालानंतर मात्र ग्रामीण भागातील नागरिकांना कारभारी मिळणार आहेत. त्यामुळे गावागावांतील इच्छुक कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा उत्साह संचारला आहे.

ओबीसी आरक्षणामुळे या निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या. गेल्या साडेतीन वर्षांपासून कोल्हापूर जिल्हा परिषदेवर देखील प्रशासक राज होते. मात्र आज झालेल्या सुनावणीनंतर तब्बल साडेतीन वर्षान या निवडणुका लागणार आहेत. मागील दोन वर्षांपासून इच्छुकांनी आपापला मतदारसंघ पिंजून काढला आहे.

मात्र, सार्वजनिक कार्यक्रमाच्या निमित्ताने इच्छुकांचे खिसे रिकामी झाले होते. निवडणकीचे नोटिफिकेशन देणे, निवडणूक कार्यक्रम घेणे ही सर्व तयारी करावी लागणार आहे. तसेच, या निवडणुकीचे म्हणून गटनिहाय किंवा तालुकानिहाय आरक्षण जाहीर करावे लागणार आहे.२०२२ मध्ये ७६ गटांसाठी २७ टक्के आरक्षणानुसार सोडत जाहीर झाली होती. यावर आक्षेप घेतल्याने हे प्रकरण न्यायप्रविष्ट होते. त्यामुळे २०२२ ला झालेली आरक्षण सोडत रद्द करत नव्याने आरक्षण सोडत होणार आहे. यापूर्वी ज्या ठिकाणी आरक्षण पडले त्या ठिकाणची आरक्षण यंदा बदलणार आहे. त्यामुळे ६७ गटांसाठी पुन्हा नव्याने आरक्षण सोडत घेतली जाईल. याबाबत निवडणूक कार्यालयाच्या नियोजनानुसार या तारखा जाहीर केल्या जाणार आहेत.

दरम्यान, जिल्हा परिषदेमध्ये महाविकास आघाडीचा मागील निवडणुकीत करिष्मा चालला. मात्र यंदा याला ब्रेक मिळण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका एकत्र लढायच्या झाल्यास महाविकास आघाडी बॅक फुटवर जाणार आहे. भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना, जनसुराज्य, ताराराणी पक्ष आघाडी, शाहू आघाडी एकत्र लढण्याची शक्यता आहे.

## परळीच्या फड

रोजी ते ट्रॅक्टरचाहप्ता भरण्यासाठी २ लाख ७० हजार रुपये घेऊनदुचाकीवरुन जात असताना, जलालपूर रोड भागातजीप आडवी लावून रघुनाथ फड, जगन्नाथ फड,सुदीप सोनवणे, बालाजी दहिफळे, विलास गिते,धनराज उर्फ राजेभाऊ फड आणि ग्यानदेव उर्फ गोट्यागिते यांनी त्यांना रॉडने मारहाण केली होती. तसेच २लाख ७० हजार रुपये काढून घेतले होते. सहेदवसातभाई यांच्याकडून रक्कम हिसकावल्याची घटनाघडल्यानंतर त्यांनी परळी पोलिसांत धाव घेतली होती.मात्र, कराडच्या दशहतीमुळे तेव्हा परळी पोलिसांनीगुन्हा नोंदवून घेतला नव्हता. त्यामुळे सातभाई यांनीन्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाच्या आदेशानंतर घटनेच्या २ वर्षांनी हा गुन्हा नोंद झाला.त्यात फड गँगवर मकोका लागला.

मकोका लागलेल्या आरोपीला अटकपूर्वजामीन मिळू शकत नाही. या कायद्यानुसारपोलिसांना आरोपपत्र दाखल करण्यासाठी१८० दिवसांची मुदत मिळते. आरोपीचाकबुलीजबाब पोलिसांना नोंदवून त्या आधारेइतर आरोपींवर कारवाई करता येते. यातकिमान ५ वर्षे ते जन्मठेपेपर्यंतची शिक्षा होऊशकते. आरोपीची सर्व बँक खाती गोठवणे,स्थावर, जंगम मालमत्ता जप्त करण्याचीतरतूद ‘मकोका’ कायद्यात आहे.

सोनवणे होता वादाचे कारण,पुण्यात वाल्मीकसोबत वावर

या टोळीतील सर्वजण हे वाल्मीक कराडचेसमर्थक होते. गोट्या गिते हा तर वाल्मीकलापुण्यातून बीडला आणताना त्याच्या ताफ्यातहोता. तर, सुदीप सोनवणे हा कारागृहातवाल्मीक कराड व गिते गँग यांच्यातझालेल्या वादाचे कारण होता. सुदीपसोनवणेमुळेच हा वाद झाला होता, अशीमाहिती तपासात समोर आली.

## राज्यावरील अवकाळीचे

भागात ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी ४०-५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. संपूर्ण विदर्भात पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यात पुढील चार दिवस अवकाळी पावसाचा मुक्काम वाढणार असून कोकण किनारपट्टीसह मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यातही अवकाळी पाऊस जोरदार हजेरी लावणार आहे.

यंदा नैंऋत्य मोसमी पाऊस नियोजित वेळेत भारतात दाखल होण्याची चिन्हे आहेत. केरळमध्ये २७ मे रोजी मोसमी पाऊस दाखल होईल, असा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे. नैंऋत्य मोसमी वाऱ्यांच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती निर्माण झाल्यामुळे मोसमी पाऊस वेळेत केरळमध्ये दाखल होईल, असेही भारतीय हवामान विभागाने सांगितले आहे.मध्य महाराष्ट्र जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी ४०-५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

गेल्या वर्षी १९ मे रोजी अंदमान-निकोबार बेटांवर नैंऋत्य मोसमी वाऱ्यांनी धडक दिली होती. तसेच नियोजित वेळेच्या आधीच म्हणजेच ३० मे रोजी मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल झाला होता. यंदाही तशीच स्थिती असण्याची शक्यता आहे. केरळमध्ये नैंऋत्य मोसमी पाऊस साधारणतः १ जूनच्या आसपास दाखल होतो. यंदा देशात चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत १०५ टक्के पाऊस पडेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. तसेच राज्यातही सर्वदूर चांगला पाऊस होणार असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे.